Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# पश्चिम खानदेशातील आदिवासी भिल्ल समाजातील स्त्रियांचे स्थान एक अभ्यास

**विजय अर्जुन गावित,** संशोधक विद्यार्थी, ट्रायबल एज्यु. सोसायटीचे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नंदुरबार

**प्रा. डॉ. आर. एम. साळुंके,** मार्गदर्शक, इतिहास विभाग प्रमुख, ट्रायबल एज्यु. सोसायटीचे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नंदुरबार

**प्रस्तावना**

आदिवासी समाजाचा इतिहास हा खूप प्राचीन आहे रामायण महाभारतात सुद्धा त्यांचा उल्लेख पहावयास मिळतो. त्यांच्या रूढीपरंपरा, जीवनपद्धती, त्यांची संस्कृती ही इतर समाजाच्या तुलनेने वेगळी आहे. आदिवासी समाजात स्त्रियांना महत्वाचे स्थान आहे स्त्री ही निर्मिती म्हणून सर्वश्रेष्ठ मानून तिला कुटुंबमाता, जन्ममाता, जलमाता, जगोमाता, राजमाता अशा अनेक नावांची उपमा दिली आहे. आदिवासी समाजात स्त्री पुरुष दोघांना सारखेच महत्व असून ती दोघी संसाराची दोन चाके आहेत. स्त्री ही मातृत्वाची भूमिका पार पाडते प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात त्यांचा पहिला गुरु म्हणजे त्यांची 'आई' असते. आईने दिलेल्या संस्कारामुळे ते परिपक्वता झालेले दिसून येतात. त्यामुळे स्त्री ही सुशिक्षित व सूसंस्कृत असणे आवश्यक आहे.

भारतामध्ये शेकडो आदिवासी जमाती आहेत त्यांच्या वेगवेगळया उपजाती ,शाखा, पोटशाखा यामध्ये विभागले गेले आहे. पश्चिम खानदेशात आदिवासी भिल्ल स्त्रीयांची प्रगल्भता, जानकारी, साक्षरता ही इतर स्त्रीयांपेक्षा कमी आहे. स्त्रीच्या सहभागाशिवाय कुटुंबाला पूर्णत्व प्राप्त होत नाही. धुळे व नंदुरबार जिल्ह्यात शिरपूर, साक्री, नंदुरबार, अक्कलकुवा, धडगाव, तळोदा, शहादा, नवापूर या भागात आदिवासी भिल्लांची वस्ती ही मोठ्या प्रमाणात दिसून येते. या भिल्ल जमातीच्या दैनंदिन जीवनात स्त्रीयांची परिस्थिती ही अतिशय हलाकीची आहे कारण या समाजामध्ये आरोग्यविषयक समस्या, शैक्षणिकविषयक समस्या, आर्थिक समस्या वगैरे अतिशय मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

**विश्लेषण**

**आदिवासी कुटुंबसंस्थेत स्त्रियांचे स्थान**

पश्चिम खानदेशात आदिवासी भिल्ल समाजात कुटुंबव्यवस्थेत संयुक्त कटुंब पद्धती व विभक्त कुटुंब पद्धती असे दोन प्रकार आहेत. कुटुंबसंस्थेत स्त्रियांना महत्वाचे स्थान आहे. "भिल्ल समाजामध्ये पितृसत्ताक कौटुंबिक व्यवस्था आहे. कुटुंबाचा प्रमुख म्हणून पुरुषाला पहिले जाते. घरात कर्ता पुरुष नसेल तर मोठा मुलगा असेल त्यांच्यावर घराची जबाबदारी असते."[१] भिल्ल जमातीत मुलगी किंवा मुलगा जन्माला आले की त्यांचे स्थान सारखेच मानतात. वंशाचा दिवा म्हणून मुलगाच हवा ही समजूत फारशी दृढ नाही विवाहाच्यावेळी मुलीला मुलगा निवडण्याचा पूर्ण अधिकार आहे.एखाद्या वेळी मुलगा आवडला नाही तर त्या मुलाबरोबर लग्न करीत नाही. मुलीच्या विवाहाच्यावेळी मोबदला म्हणून वधूपिता हा मुलाच्या बापाकडून 'देज' (वधुमुल्य) घेण्याची प्रथा आहे. परंतु वधूपित्याने घेतलेल्या पैशांचे वधूला काही दागदागिने घेऊन देण्याची रीत आहे. यामुळे आदिवासींच्या लग्न पद्धतीत खऱ्या अर्थाने लोकशाहीची तत्वे दिसून येतात. एखाद्या स्त्रीचा नवरा मरण पावला असेल तर तिला पुनर्विवाह करण्याचा अधिकार आहे. त्याला


Copyright © | JET Network, All Rights Reserved

समाज विरोध करीत नाही दिर आपल्या वाहिनी व भावाच्या मुलांना सांभाळून घेतो. एखाद्या वेळेस पती जर मरण पावला असेल आणि त्या स्त्रीला लहान लहान मुले असेल तर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी स्वतः घेऊन आपल्या मुलाबाळांचे पालन पोषण आदिवासी स्त्री करू शकते.

**आर्थिक परिस्थितीत स्त्रियांचे स्थान**

आदिवासी भिल्ल जमातीचे मुख्य व्यवसाय शेती हा आहे. त्यांचा उदरनिर्वाह हा शेतीवर अवलंबून आहे. तसेच शेतीबरोबर काही लोक पशुपालन हा जोड धंदा सुद्धा करतात. पश्चिम खानदेशातील "आदिवासी स्त्रियांचे कोंबडा आरवण्यापासून त्यांचा दिवस सुरु होतो सकाळी उठल्यावर पाणी भरण्यापासून ते जेवण बनविल्यानंतर गोठ्यातील गायी, बैलांचा शेण साफ करणे, त्यानंतर शेतावर कामाला जाणे, शेतीमधील चिवट आणि चिकाटीने शेतात काम करणे शेतात पेरणी करणे, निंदनी करणे, कापणी करणे, काढणी, मळणी, वेचणी इत्यादी कामे आदिवासी स्त्री करते."[२] एखाद्या वेळेस नवरा मरण पावला असेल किंवा नवऱ्याला काम करता येत नसेल तर काही स्त्रिया ह्या शेतामध्ये नांगरसुद्धा हाकलतात. तसेच काहींची शेत जमीन नसेल तर ते शेतमजुरी करतात लाकडाची मोळी गोळा करणे, कंदमुळे गोळा करणे, मोहाची फुले गोळा करणे, कोंबड्या बकऱ्या पाळणे ही सर्व कामे आदिवासी स्त्रिया करून आपल्या कुटुंबाला हातभार लावतात. व्यसनी आळशी, कामचुकार पुरुषाच्या घरातील स्त्रिया कुटुंबिक जबाबदारी पूर्णपणे सांभाळून कुटुंबाची उपजीविका भागवण्यासाठी धडपड करतांना दिसून येते. व्यसनी नवऱ्याच्या क्रोधाची शिकार होण्याचीही वेळ तिच्यावर येते. पण स्वतःचे दुःख लपवून दुसऱ्याला आनंदी ठेवण्याची जीवनकला तिच्यात आहे.

**आदिवासी स्त्रीयांचे आरोग्य**

आदिवासी स्त्रिया ह्या दारिद्र्य आणि कष्टमय जीवन जगत असतांना आपल्या आरोग्याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. त्यामुळे त्यांचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर दिसून येते. भिल्ल समाजातील स्त्रिया आरोग्यविषयक समस्येविषयी त्या अज्ञानी असतात. "कष्टाच्या आणि दगदगीच्या दिनचर्यात स्वतःकडे लक्ष देण्याचा वेळ नसतो. मासिक पाळीतील रक्तस्राव, पांढरे पाणी अंगावर जाणे,तसेच समतोल आहाराचा अभावामुळे त्यांना आजार होतात. आदिवासी स्त्री ही शहरापासून लांब अतिदुर्गम भागात असल्यामुळे अशुद्ध पाणी, असमतोल आहार, विवाहाचे वय, गरोदरपणात व बाळंतपणात आरोग्यासाठी दवाखान्याची जवळ नसलेली सुविधा, लैगिक जीवनातील समस्या, यामुळे आदिवासी स्त्रियांचे आरोग्य धोक्यात येते."[३] अक्कलकुवा, धडगाव या भागात नात्यामध्ये होणाऱ्या विवाहांमुळे कुपोषण हा एक भयंकर आजार या आदिवासी गाव पाड्यात दिसून येतो या आजारामुळे तिचे जन्माला आलेले बाल जन्मताच रोगाला अनुकूल असते. अशा परिस्थितीत आई व बाळ दोघांना धोका असतो. पश्चिम खानदेशातील स्त्रिया जीवन जगतांना समाजातील काही स्त्रिया तंबाखू, तपकीर यासारख्या व्यसनामुळे त्यांच्या आरोग्यावे परिणाम होतांना दिसून येते. मात्र आजच्या काळात तरुण महिलांमध्ये हे व्यसन आढळून येत नाही.

**डाकीण प्रथा**

आदिवासी समाजातील स्त्री ही पुरुषाच्या अत्याचाराला बळी न पडता ती कोणत्याही संकटांना तोंड देवून आपले जीवन जगते परंतु या समाजात आदिवासी स्त्री एका अमानुष प्रथेची बळी पडते ती म्हणजे 'डाकीण प्रथा' होय. या विद्येला 'काळी विद्या' असेही म्हणतात. "ही प्रथा म्हणजे आदिवासी समाजातील कलंक असलेली एक प्रथा आहे. इथे एक प्रश्न पडतो तो म्हणजे एखादा पुरुष जर जादूटोणा तंत्र मंत्र शिकला


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

असेल तर त्याला भगत म्हणून समाजात मानसन्मान मिळतो पण एखाद्या स्रीला अशी विद्या अवगत असेल तर तिला डाकिण म्हणून मानले जाते. इथे आदिवासी समाजात स्त्री आणि पुरुष भेदभाव दिसून येतो. विधवा स्त्री, सासरी न नांदणारी, वाझोटी, अविवाहित, कोणाचा आधार नसलेली स्त्री किंवा नवऱ्याने सोडून दिलेली अश्या स्रियांना कोणतीही विद्या अवगत नसेल तरी त्यांना डाकीण म्हणून हिणवण्यात येते."[४] गावात एखादी व्यक्ती आजारी असेल तर तिला जबाबदार धरून मारहाण केली जाते किंवा एखद्या वेळेस गावाच्या बाहेरसुद्धा काढले जाते. ही प्रथा आदिवासी समाजाला कलंक लावणारी आहे.

**आदिवासी समाजातील स्रियांचे शैक्षणिक स्थान**

धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाज हा रूढी परंपरा, अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रधा या घटकांमध्ये गुंतलेला दिसून येतो. उपासमार, बेरोजगारी, व्यसने यांच्या चक्रव्युहात अडकलेल्या या समाजाला शिक्षणाची मोठी गरज आहे. आदिवासी स्त्री अतिदुर्गम भागात राहणारी कष्टाच्या कामालाच आपला धर्म मानणारी या स्रियांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होतांना दिसते. पूर्वीच्या काळात आदिवासी गाव पाड्यात शाळेची सुविधा नसल्यामुळे मुली शिक्षणापासून वंचित होत्या. "आजच्या काळात मुलांबरोबर मुलींच्याही शिक्षणाची सुरुवात झाली आहे शासनाने सर्वशिक्षा अभियान, मोफत व सक्तीचे शिक्षण, शिष्यवृत्ती, वस्तीग्रह, आश्रम शाळा, निवासी पोस्ट बेसिक आश्रम शाळा, मोफत एसटी पास योजना इत्यादी योजना सरकारने लागू केल्यामुळे आदिवासी भागातील काही भागात शिक्षणाचा टक्का वाढला आहे."[५] परंतु धडगांव व अक्कलकुवा या सारख्या भागात अजूनही काही गाव पाड्यात शाळा किंवा रस्ता नसल्यामुळे किंवा काही शाळेवर शिक्षक नसल्यामुळे ते शिक्षणापासून वंचित आहेत.शालेय शिक्षण हे मराठी माध्यम आहे आणि आदिवासी समाजात स्थानिक बोली भाषेचा वापर अधिक केला जातो. त्यामुळे शैक्षणिक विरोधाभास दिसून येतो. आजच्या काळात काही आदिवासी स्रिया या शिक्षण घेऊन शहरामध्ये नोकरी करतांना दिसतात तर काही महिलांनी उच्च शिक्षण घेऊनसुद्धा त्यांना नोकरी मिळालेली नाही.

**सामाजिक चळवळीत आदिवासी महिलांचे कार्य**

पश्चिम खानदेशातील आदिवासी भागातील स्त्री ही दोन टक्के का असेना पण आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी रस्त्यावर उतरतांना दिसून येते. आजच्या काळात वेगवेगळया सेवाभावी संस्था, सत्यशोधक, मार्क्सवादी स्त्री कार्यकर्त्यांनी आणि श्रमिक संघटनांनी त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फडली आहे. कॉं. नजूबाई गावित त्यांनी आदिवासींच्या जल जमीन जंगल हिरावून घेतलेला हक्क आदिवासींना मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. १९७८ मध्ये 'सत्यशोधक कष्टकरी महिला संघा'ची स्थापना करून आदिवासी भूमिहीन शेतकरी, धरणग्रस्त, महागाईग्रस्त, महिला, दलित इंत्यादी उपेक्षित, वंचित पिडीत घटकांच्या संदर्भात पुढाकार घेतला. त्यामुळे अनेकवेळा त्यांना करावास ही भोगावा लागला."[६] नजूबाईचे सामाजिक चळवळीचे हे कार्य अविस्मरणीय असेच आहे. नजूबाई बरोबरच मेघा पाटकर या महिला कार्यकर्त्यांनीही आदिवासी समाजासाठी मोलाचे कार्य केले आहे.सरदार सरोवरांमुळे आदिवासींचे जल जमीन जंगल तसेच विस्तापनाचा प्रश्न निर्माण झाला होता तेव्हा या मेघा पाटकरांनी नर्मदा बचाव आंदोलन सुरु केले या आंदोलनामध्ये काही आदिवासी स्रियांचा सहभाग होता.

**आजच्या काळातील आदिवासी स्रीयांची परिस्थिती**

पश्चिम खानदेशातील आजच्या काळामध्ये आदिवासी स्रीयांची परिस्थितीत काही प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. पूर्वी दऱ्याखोऱ्यात राहणारी आदिवासी स्त्री ही आजच्या काळात गाव सोडून शहरात


Copyright © | JET Network, All Rights Reserved

कामधंदा करण्यासाठी जाते. उदा. बार्डोली, सुरत या शहरामध्ये ती कामाला जाऊन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. आजच्या काळात विविध आश्रम शाळा, माध्यमिक विद्यालय, महाविद्यालये व वस्तीग्रहाची सोय उपलब्ध झाल्यामुळे पूर्वीच्या काळापेक्षा आजच्या काळात या भिल्ल समाजात महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण हे काही टक्क्यांनी वाढल्यामुळे आदिवासी मुली या शहरात जाऊन शिकू लागल्या आणि शिकून त्या डॉक्टर, वकील, परिचारिका, शासकीय अधिकारी, शिक्षिका, प्राध्यापिका, पोलीस इत्यादी क्षेत्रात त्या नोकरी करीत आहे. परंतु हे प्रमाण अत्यंत अल्प आहे. मात्र काही का असेना पण पूर्वीपेक्षा आजच्या काळात ही सुरुवात झाली आहे यांचे आपण स्वागतच केले पाहिजे. मात्र शिक्षित स्त्री आणि असुक्षित स्त्री यातील दोरी मोठी आहे.

"आजच्या काळात स्त्रिया कायद्याचा आधार घेण्याचा प्रयत्न करतांना दिसून येत आहे. परंतु या केसेसमध्ये कायद्याच्या अज्ञाना अभावी खोट्या खोट्या केसेसमध्ये अडकविले जाते. त्यावेळेस न्याय हा बाजूलाच राहतो व तिचे मानसिक छळ व आर्थिक लुट होते. बलत्कार, घटस्फोट, पोटगी, मुलगी पळवून नेणे,सदर बाबींना प्रसिद्धी मिळते हे प्रकार स्त्रीत्वाला कलंक लावणारे आहेत."[७] आधुनिक काळात आदिवासी स्त्रियांचे सामाजिक प्रश्न तसे फार नाहीत परंतु आरोग्याच्या समस्या त्यांच्या समोर खूप आहेत गरोदरपणातही काम करते तसेच त्यांना सकस आहाराच्या कमतरतेमुळे कुपोषण आणि सिकलसेल यासारख्या आजाराचे त्या बळी पडतात. त्यामुळे या महिलांना व होणाऱ्या बालकांचा मृत्यू होऊ शकतो. नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा, धडगांव या तालुक्यातील खेड्यापाड्यात स्त्रिया आजही दवाखान्यात जाण्यासाठी लाजतात परंतु हे सर्व विसरून स्त्रियांनी दवाखान्याचा इलाज हा केला पाहिजे.

**निष्कर्ष**

आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात देशात संपूर्ण सोयी सुविधा, दळण वळणाची साधने, तंत्रज्ञान उपलब्ध आहे. मात्र आजही आदिवासी पाड्यात पायाभूत, वैद्यकीय सुविधा ही पोहोचलेली नाही हे नाकारता येत नाही. आदिवासीच्या वास्तव्याचा दुर्गम भागात प्राथमिक वैद्यकीय सुविधा नसल्यामुळे आदिवासी स्त्रियांचे सर्वाभिने बळी जात आहे. डोंगरदऱ्यात राहणारी आदिवासी स्त्री ही आजही दवाखान्यात जाण्यासाठी लाजते त्यामुळे आरोग्याच्या समस्या ह्या त्यांच्या जीवन जगण्याच्या शैलीशी निगडीत आहेत. नात्यात होणाऱ्या विवाहामुळे सिकलसेल व कुपोषण सारखा आजार हा अक्कलकुवा, धडगांव या भागात दिसून येतो तसेच या भागातील गरोदर मातांमध्ये पंडूरोग या रोगांचेही प्रमाण अधिक आढळते.

आदिवासी भिल्ल जमातीतील स्त्रिया दारिद्र्याशी झगडत झगडत आपले कष्टमय जीवन जगत असतांना पूर्ण सामार्थ्याशी ती येणाऱ्या प्रत्येक दिवसाला तोंड देण्यात तयार असते. काही आदिवासी भागातील स्त्रिया शिक्षण घेऊन शहरात नोकरी करतांना दिसतात. परंतु हे प्रमाण अत्यंत अल्प आहे शिक्षण क्षेत्रात सुधारणा केल्याने हे प्रमाण वाढू शकते. तसेच अलीकडे घटस्फोट, पोटगी या बाबींमुळे स्त्रिया कायद्याचा आधार घेण्याचा प्रयत्न करतांना दिसत आहे मात्र यातून काही स्त्रियांना अपमानाची वागणूक मिळते. यासाठी कायद्याच्या संरक्षणाची आवश्यकता आहे.

**संदर्भ**

१. प्रा. डॉ. पवार सुलतान, आदिवासी समाज संस्कृती,साहित्य आणि भाषा, अथर्व पब्लीकेशन्स जळगांव प्रथमावृत्ती २०२४ पृ. ६९.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

२. प्रा. डॉ. गावित पुष्पा यशवंत, आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य, अथर्व पब्लीकेशन्स जळगांव प्रथमावृत्ती २०१४ पृ. ४२.
३. कित्ता पृ. ४३
४. कित्ता पृ. ४३
५. डॉ. खोडेवाड देविदास, महाराष्ट्रातील आदिवासी समाज जीवन, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद प्रथमावृत्ती २०१८ पृ. ९५.
६. Marathi.indiatime.com
७. डॉ. खोडेवाड देविदास, महाराष्ट्रातील आदिवासी समाज जीवन, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद प्रथमावृत्ती २०१८ पृ. ९७.


Copyright © | JET Network, All Rights Reserved